कोरोना विषाणू (कोव्हीड-19) मुळे बाधित झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून गणना करणेबाबत.

**नवी मुंबई महानगरपालिका**
**सामान्य प्रशासन विभाग**
**परिपत्रक ; जा.क्र.नमुंमपा/प्रशा/आस्था-10/कोरोना-19/1415/2020,**
**दिनांक:-20/07/2020**

---

परिपत्रक -

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) कोरोना विषाणू (COVID-19) संक्रमण हा जागतिक साथीचा रोग घोषित केलेला आहे. त्याअनुषंगाने भारत सरकारने व तदअनुषंगाने राज्य सरकारने कोरोना विषाणूचा संक्रमण व प्रादुर्भाव नियंत्रित करणे व रोखणे याकरीता वेळोवेळी शासन निर्णय/अधिसूचनेव्दारे मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूचा संक्रमण व प्रादुर्भाव नियंत्रित करणेकरीता विविध प्रकारच्या उपाययोजना राबविणेत येत आहेत.

सदर उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील बहुतांश अधिकारी/कर्मचारी तसेच कंत्राटी/ठोक मानधनावरील कर्मचाऱ्यांना कोरोना विषाणू (कोव्हीड-19) संदर्भातील विविध कामकाज सोपविण्यात आलेले आहे. सदरचे कामकाज पार पाडताना काही अधिकारी/कर्मचाऱ्यांना कोरोना विषाणू (कोव्हीड-19) संसर्गाची बाधा होऊन, प्रकरणी त्यांना वैद्यकिय उपचाराकरिता रूग्णालयात दाखल व्हावे लागले आहे. तसेच काही अधिकारी/कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेने स्थापित केलेल्या Institutional Isolation मध्ये दाखल करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे काहींना वैद्यकिय सल्ल्यानुसार Home Isolation राहणेबाबत सूचित करण्यात आले आहे. कोरोना विषाणू (कोव्हीड-19) मुळे बाधित झालेले संबंधित अधिकारी/कर्मचारी रोगमुक्त झाल्यानंतर त्यांना वैद्यकिय सल्ल्यानुसार पूर्णतः recovery करिता काही दिवस घरी राहणेबाबतही सूचित केले जाते. तद्नंतर संबंधित अधिकारी/कर्मचारी कर्तव्यावर रूजू झाल्यानंतर त्यांचा सदर अनुपस्थिती कालावधी नियमित करण्याची बाब या कार्यालयाच्या विचाराधीन होती.

सबब संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा सदर अनुपस्थिती कालावधी नियमित करणेबाबत या कार्यालयाकडून निर्णय घेण्यात येत आहे. त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे अधिनस्त कार्यरत असलेल्या कोरोना विषाणू (कोव्हीड-19) मुळे बाधित असलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा उपचारादरम्यानचा सदर कालावधी हा 'कर्तव्य कालावधी' म्हणून गणण्यात यावा. तसेच सदर कालावधीतील अनुपस्थितीबाबत त्यांचेकडून कोणत्याही प्रकारच्या रजेचा अर्ज घेण्यात येऊ नये व त्यांचे वेतनात कोणतीही कपात न करता, त्यांना संपूर्ण वेतन अदा करण्यात यावे.

उपरोक्त निर्देशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

20/07/2020

(अभिजीत बांगर)
आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका.

प्रत - 1) अतिरिक्त आयुक्त (1/2), नवी मुंबई महानगरपालिका.
2) सर्व विभाग / कार्यालय प्रमुख________